# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही- ४४१ २२२

## कृषि हवामान सल्ला पत्रक

## चंद्रपूर जिल्हा

क्र.कृ.ह.स./०३/कृ.सं.के./९३१/२०२१ — दिनांक ०८ जानेवारी २०२१

| सिंदेवाही येथील मागील आठवड्यातील हवामान स्थिती दिनांक ०१ ते ०७ जानेवारी २०२१ | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक ०९ ते १३ जानेवारी २०२१ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/०१ | ०२/०१ | ०३/०१ | ०४/०१ | ०५/०१ | ०६/०१ | ०७/०१ | दिनांक | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २८.५ | २८.० | २९.५ | २८.५ | ३०.० | ३१.० | २८.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३०.८ | ३१.५ | ३१.८ |
| ८.० | ११.० | १०.० | ११.० | ९.५ | ११.५ | १३.५ | किमान तापमान (अं.से.) | २१ | २० | २०.२ | १९ | १७ |
| निरभ्र | अंशतः ढगाळ | निरभ्र | अंशतः ढगाळ | निरभ्र | आंशिक ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | अंशतः ढगाळ | आंशिक ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ८७ | ७१ | ८० | ८१ | ८० | ८० | ८४ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ७० | ७२ | ७५ | ७३ | ६८ |
| ४२ | ५३ | ४२ | ५० | ४१ | ४२ | ५१ | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ५५ | ५० | ५२ | ५२ | ५२ |
| १.६ | २.६ | २.१ | २.१ | २.३ | १.६ | १.१ | वा-याचा वेग (किमी/तास) | २ | २ | २ | २ | २ |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) ०१/०१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) ०१/०६/२०२० पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० (०) | १२६६.४ (७०) | १०१५.० (५३) |

| हवामान अंदाज | पुढील पाच दिवसात दिनांक ०९ ते १३ जानेवारी २०२१ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात आंशिक ढगाळ ते अंशतः ढगाळ हवामान राहून कमाल तापमान ३०.० ते ३१.८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १७.० ते २१.० अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. |
|---|---|

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषी सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ रबी पिकांना (गहू, जवस, मोहरी व करडई) उपलब्धतेनुसार व आवश्यकतेनुसार सायंकाळच्या वेळेस ओलीत करावे. |
| उन्हाळी धान | नर्सरी | ➢ धान रोपवाटिकेत पेरणीनंतर १५ दिवसांनी तण/ कचरा काढून टाकावे व नंतर दर गुंठ्यास एक किलो युरिया द्यावा.<br>➢ रात्रीच्या वेळेसचा घटलेल्या तापमानाचा भात पिकाच्या रोपांच्या वाढीवर होणाऱ्या विपरीत परिणाम टाळण्यासाठी रात्रीच्या वेळेस प्लास्टिक अच्छादन किंवा भाताचा तनसाचे आच्छादन टाकावे व सकाळी काढून घ्यावे जेणेकरून भाताच्या रोपांची वाढ चांगली होईल.<br>➢ रोपवाटिकेवर करपा व कडाकरपा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास कॉपर ऑक्सिक्लोराइड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन ०.५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून लागवडीनंतर १० दिवसाच्या अंतराने दोन ते तीन फवारण्या कराव्यात. |
| गहु | वाढीची अवस्था | ➢ ढगाळ हवामानामुळे गव्हावरील मावा किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्याच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ टक्के डब्ल्यूजी १० ते १५ ग्रॅम किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही इसी ४० मी.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकास पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार पिकाच्या गरजेनुसार ओलीत करावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे.<br>➢ गहू पिकाला पेरणीनंतर १८ ते २० दिवसांनी नत्र खताची दुसरी मात्रा (५० ते ६० किलो प्रती हेक्टरी) पहिल्या पाणी देतांना द्यावी. |
| हरभरा | फुल अवस्था | ➢ घाटे अळीच्या एकात्मिक वेवस्थापणासाठी प्रती हेक्टरी २० पक्षी थांबे शेतामध्ये लावावे.<br>➢ घाटे अळीने आर्थिक नुकसानीची पातळी (१-२ प्रती मिटर ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली. किंवा एच.ए.एन.पि.व्ही. (१x१०$^{९}$) पिओबी/मिली) ५०० एल.ई/हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के इसी २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| जवस | फुल अवस्था | ➢ वेळेवर पेरणी केलेल्या जवस पिकास पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार पिकाच्या गरजेनुसार ओलीत करावे.<br>➢ जवस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्याच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा मॅलॅथिऑन ५० टक्के प्रवाही १० मिली किंवा क्विनालफॉस ३५ टक्के प्रवाही २० मी.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| मोहरी | फुल अवस्था | ➢ वेळेवर पेरणी केलेल्या मोहरी पिकास पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार पिकाच्या गरजेनुसार ओलीत करावे.<br>➢ मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) आढळताच डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |

| | | |
|---|---|---|
| करडई | फुल अवस्था | ➢ पेरणीनंतर ३०, ५० आणि ६५ दिवसांनी ओलिताच्या तीन पाळ्या द्याव्या. जेथे एकाच ओलिताची सोय आहे तेथे ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास ३० व ५० दिवसांनी ओलीत करावे. ओलीत करतांना पिकात जास्त वेळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी.<br>➢ मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) आढळताच डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| तूर | फुले व शेंगा अवस्था | ➢ शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी पिक ५० टक्के फुलावर आल्याबरोबर पहिली फवारणी क्विनॉलफॉस २५ टक्के इसी १६ मि.ली. त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| वांगी | फुल ते फळ | ➢ वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाया अळीचा प्रादुभाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेंझोएट ५% एस.जी. ४ ग्राम किंवा अझाडीराक्टीन १% २० मि.ली. किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ % प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्थानिक वातावरणाचा अंदाज घेऊन फवारणी करावी. |
| पशुपालन सल्ला | | ➢ तापमानात घट होत असल्यामुळे गाई, म्हशी, बैल व शेळ्यांच्या गोठ्याला बारदाण्याचे पडदे लावून थंडीपासून संरक्षण करावे. तसेच शेडमध्ये रात्रीच्या वेळी विधुत बल्ब लावून शेडमध्ये ३० अं.से. पर्यन्त नियंत्रित करावे.<br>➢ रब्बी हंगामात घेणा-या मका, ओट, बरशीम लसूनघास व ज्वारी चारा पिकाची लागवड करावी.<br>➢ जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे.<br>➢ गाई, म्हशी व बैल यांना पायखुरी व तोंडखुरी (एफ.एम.डी) रोगाच्या संरक्षणासाठी लसीकरण करून घावे. |
| कुकुटपालन सल्ला | | ➢ तापमानात घट होत असल्यामुळे कोंबड्यांच्या शेडला बारदाण्याचे पडदे लावून थंडीपासून संरक्षण करावे. तसेच शेडमध्ये रात्रीच्या वेळी विधुत बल्ब लावून शेडमध्ये ३० अं.से. पर्यन्त नियंत्रित करावे. |
| ➢ टिप : रासायनिक तननाशक व किटकनाशकाची फवारणी करताना संरक्षक कीटचा वापर अवश्य करावा. | | |
| शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२० मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा. | | |
| | प्रकल्प समन्वयक<br>ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,<br>सिंदेवाही जि. चंद्रपूर | |